अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय,
आस्थापना विभाग, पुणे मनपा.
जा.क्र. :- अतिमआ/साप्रवि/आस्था/3004
दिनांक : 05/08/2020

-: आदेश :-

विषय :- <u>कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.</u>
कोरोना विषाणू आजाराच्या (कोवीड-१९) अनुषंगाने पी.एम.पी.एम.एल.कडील पर्यायी कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीबाबत.

संदर्भ :-
१) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३.०३.२०२०.
२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम,२०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
४) आदेश जा.क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/२५६५, दि.१७.०७.२०२०.
५) पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांचे जा.क्र. पी.एम.पी.एम.एल./ अेओ/७६०, दिनांक २३/०७/२०२०

पुणे महानगरपालिका हद्दीत सध्या कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढत आहे, त्याचा प्रसार होऊ नये यासाठी पुणे महानगरपालिका वेगवेगळया स्तरावर कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जात आहेत.

पुणे महानगर परिवहन महामंडळ मर्यादित यांचेकडून कोव्हिड प्रतिबंधक कामासाठी कर्मचारी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यानुसार कोव्हीड-१९ साथीच्या रोगाच्या नियंत्रणासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळ मर्यादित कार्यालयातील कर्मचाऱ्यांची संदर्भ क्र.४ चे आदेशान्वये नेमणूक करण्यात आली आहे. सदर आदेशानुसार परिमंडळ क्र.३ कडे अ.क्र.६ येथील श्री.भालचंद्र भगवान, वाहक क्र.२९३४, अ.क्र.३१ येथील श्री.सुशांत घोडेकर, चालक क्र.४२९२, अ.क्र.३५ येथील श्री.योगेश रणवरे, चालक क्र.४२८१ यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

उपरोक्त कर्मचाऱ्यांचे या आदेशानुसार संदर्भ क्र.४ चे आदेशातून नाव रद्द करण्यात येत आहे. त्यांचे ऐवजी पर्यायी कर्मचारी म्हणून पुणे महानगर परिवहन महामंडळ मर्यादित कार्यालयातील १) श्री.शेखर सोमनाथ गयावळ, हेल्पर क्र.१७८, २) श्री. संजय दादु कुचेकर, क्लिनर क्र.११५४, ३) श्री.महमंद इब्राहीम बागवान, हेल्पर क्र.८२० यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

सदर कर्मचारी यांनी उप आयुक्त, परिमंडळ क्र.३ यांचे नियंत्रणाखाली त्यांचे आदेशानुसार कामकाज करावयाचे आहे.

सदर सेवक नेमून दिलेल्या ठिकाणी हजर न झाल्यास व सदरच्या कालावधीत या कामास नकार देणा-या, हलगर्जीपणा करणा-या व्यक्तींविरुद्ध संदर्भीय कायद्यान्वये कार्यवाही करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

उप आयुक्त, परिमंडळ यांनी त्यांचे अधिनस्त कोरोना विषाणू आजाराच्या कामकाजाबाबत सदर सेवकांचे आदेश आपले स्तरावरून प्रसृत करावेत.

सदर कर्मचाऱ्यांची महिनेमहाची हजेरी पाठविताना कर्मचाऱ्याचे नाव, हुद्दा, क्रमांक व आगार या बाबी नमूद करून सदरची हजेरी दरमहाच्या २७ तारखे पर्यंत महामंडळाच्या admin@pmpml.org या ई-मेलवर तसेच पुणे महानगर परिवहन महामंडळाकडे पत्राद्वारे कळवावी.

वरील कर्मचाऱ्यांची नियुक्ती या आदेशाच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत करण्यात येत आहे. तसेच सदरचे सेवकांचे रुजू अहवाल परिमंडळ कार्यालयाने उप आयुक्त (सामान्य प्रशासन) यांचेकडे सादर करावेत.

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत – १) मा. व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ मर्यादित, पुणे
२) मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका
३) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि), पुणे महानगरपालिका यांना माहितीस्तव.